॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

**✲ सुविचार ✲**

पैशाने माणसाला
महत्व प्राप्त होते.

■ अहिल्यानगर ■ शनिवार, दि. २० जून २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक १९ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145 www.veerbhuminews.com

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### डरकाळी

वर्धापनदिनी घातली
आता वाघांचीच मुंज
ही अखेरची तडफड
की संख्याबळाची झुंज
तेलही गेले तसे तूपही
उरले धुपाटणेच हाती
अंकुश निसटल्यावर
खापर कोणाच्या माथी

## SPOT NEWS

### उद्या २२ लाख विद्यार्थी देणार नीटची फेर परीक्षा

● **नागपूर** – प्रश्नपत्रिका फुटीनंतरही नॅशनल टेस्टिंग एजन्सीचा कारभार सुधारला नसल्याचे समोर येत आहे. नीट पेपर लीकवरून वातावरण तापले. पालक, विद्यार्थ्यांनी परीक्षा एजन्सीविरोधात संताप व्यक्त केला. त्यानंतर देशभरात उद्या, रविवारी २२ लाख विद्यार्थी नीटची फेर परीक्षा देणार आहेत. देशभरातील ५५१ शहरांमध्ये आणि परदेशातील १४ शहरांमध्ये २२ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी या परीक्षेसाठी नोंदणी केली आहे. शहर पातळीवरील व्यवस्थेवर देखरेख ठेवण्यासाठी ६७४ शहर समन्वयकांची नियुक्ती करण्यात आली आहे, तर परीक्षा केंद्रांवर स्वतंत्र देखरेखीसाठी ६ हजार ६६९ पर्यवेक्षक तैनात करण्यात आले आहेत. फेरपरीक्षा सुरळीत आणि निष्पक्षपणे पार पडावी यासाठी पोलिस आणि जिल्हा प्रशासनाच्या अधिका–यांसह दोन लाखांहून अधिक कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. ही पुनर्परीक्षा दुपारी २ ते सायंकाळी ५.१५ या वेळेत लेखी स्वरूपात घेतली जाईल.

### टेलिग्राम ॲपवर २२ जूनपर्यंत बंदी कायम

● **नवी दिल्ली** – नीट यूजी परीक्षेच्या पार्श्वभूमीवर टेलिग्राम या लोकप्रिय मेसेजिंग ॲपला दिल्ली उच्च न्यायालयाकडून अतिशय मोठा झटका बसला आहे. केंद्र सरकारने टेलिग्राम ॲपवर २२ जूनपर्यंत घातलेल्या तात्पुरत्या बंदीला आव्हान देणारी टेलिग्रामची याचिका हायकोर्टाने फेटाळून लावली आहे. शुक्रवार, १९ जून २०२६ रोजी न्यायमूर्ती तेजस कारिया यांच्या एकलपीठाने हा महत्त्वपूर्ण निर्णय सुनावला. कोर्टाच्या या निर्णयामुळे आता २२ जूनपर्यंत देशात टेलिग्रामवरील बंदी कायम राहणार आहे. याचिका फेटाळताना न्यायालयाने स्पष्ट केले की, परीक्षेची गोपनीयता आणि सुरक्षितता लक्षात घेता केंद्र सरकारने घेतलेला हा निर्णय कोणत्याही प्रकारे अयोग्य किंवा असंगत म्हणता येणार नाही. गेल्या महिन्यात ३ मे रोजी झालेली नीट यूजी परीक्षा पेपर लीक प्रकरणामुळे वादात सापडली होती. यावरून देशभरात प्रचंड गदारोळ झाला होता आणि नॅशनल टेस्टिंग एजन्सीसह शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनाही तीव्र विरोधाचा सामना करावा लागला होता. यानंतर सरकारने ती परीक्षा रद्द करण्याचा मोठा निर्णय घेतला होता.

# धरणे, जलसाठ्यांचे सप्टेंबरपर्यंत सूक्ष्म नियोजन करा

**पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील । जिल्हाधिकारी कार्यालयात एल निनोच्या पार्श्वभूमीवर पूर्वतयारी आढावा बैठक**



● **अहिल्यानगर । वीरभूमी**– एल निनोच्या प्रभावामुळे पावसास उशीर झाल्यास जिल्ह्यात पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे जिल्ह्यातील मोठ्या धरणांमधील तसेच मध्यम व लघु प्रकल्पांमधील उपलब्ध पाणीसाठ्याचे सप्टेंबरपर्यंत सूक्ष्म आणि काटेकोर नियोजन करण्यात यावे. पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देत आवश्यक पाणीसाठा आरक्षित ठेवण्याचे निर्देश पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित एल निनोच्या पार्श्वभूमीवरील पूर्वतयारीच्या आढावा बैठकीत पालकमंत्री डॉ. विखे पाटील बोलत होते.

यावेळी आमदार काशिनाथ दाते, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, उपवनसंरक्षक धर्मवीर साळविठ्ठल, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेटे, कार्यकारी अभियंता सायली पाटील यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले की, गावे, वाड्या–वस्त्यांच्या गरजेनुसार पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्यात यावे. ज्या गावांमध्ये पाणीपुरवठा योजना उपलब्ध नाहीत, त्या ठिकाणी टँकरमधील पाणी थेट विहिरीत न टाकता तोटीयुक्त प्लास्टिकच्या टाक्यांमधून नागरिकांना वितरित करावे. यामुळे पाण्याचा अपव्यय टळून सर्व नागरिकांना समान आणि पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध होईल.

ते पुढे म्हणाले की, टँकरमध्ये भरण्यात येणाऱ्या पाण्याचे नमुने नियमितपणे तपासण्यात यावेत. नागरिकांना स्वच्छ आणि सुरक्षित पिण्याचे पाणी मिळेल याची संबंधित यंत्रणांनी दक्षता घ्यावी. तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी पाणीपुरवठा स्रोतांची प्रत्यक्ष पाहणी करून परिस्थितीचा नियमित आढावा घ्यावा. गावनिहाय टँकरद्वारे पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक तयार करून त्यानुसारच वितरण करण्यात यावे. तसेच ज्या ठिकाणांहून टँकरसाठी पाणी भरले जाते, तेथील वीजपुरवठा अखंडित राहील याची महावितरण कंपनीने काळजी घ्यावी, अशा सूचनाही पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी दिल्या.

जिल्ह्यातील पशुधनाला चाऱ्याची कमतरता भासू नये यासाठी कृषी आणि पशुसंवर्धन विभागाने संयुक्तपणे चारा उपलब्धतेचा आढावा घ्यावा. गावनिहाय आणि तालुकानिहाय चाऱ्याचे नियोजन करावे. जिल्ह्यातील चारा जिल्ह्याबाहेर जाणार नाही, याची दक्षता घेत पशुपालकांना वेळेवर मदत मिळेल यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

ग्रामीण भागातील नागरिकांना स्थानिक स्तरावर रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी रोजगार हमी योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणावर कामे मंजूर करावीत. संभाव्य दुष्काळी परिस्थितीत नागरिकांना आर्थिक आधार मिळावा, यासाठी नियोजनबद्ध रोजगारनिर्मितीवर भर द्यावा. तसेच पाणी जपून वापरण्याबाबत ग्रामीण आणि शहरी भागात व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात यावी, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी जिल्ह्यातील पर्जन्यमान, धरणांमधील पाणीसाठा, टँकरद्वारे होणारा पाणीपुरवठा, चारा टंचाई उपाययोजना आणि रोजगार हमी योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

## 'वृद्धेश्वर'च्या दोन जागेसाठी मतदान

**आ. राजळे गटाच्या १७ जागा बिनविरोध । बिनविरोधची परंपरा खंडीत**

● **पाथर्डी । वीरभूमी**– तालुक्याची कामधेनू म्हणून ओळख असलेल्या आदिनाथनगर येथील श्री वृद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या १९ जागांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरु आहे. उमेदवारी अर्ज माघारीच्या अखेरच्या दिवशी सर्वसाधारण उत्पादक व्यक्ती सभासदांनी निवडून द्यावयाचे प्रतिनिधी मतदारसंघातून कासार पिंपळगाव गटातील दोन जागेसाठी तीन अर्ज राहिल्याने येथे मतदान होणार आहे. तर कासार पिंपळगाव गट वगळता इतर मतदारसंघातील १७ जागा बिनविरोध निवडून आणण्यात सत्ताधारी आ. मोनिका राजळे यांच्या गटाला यश आले आहे.



वृद्धेश्वर सहकारी साखर कारखाना निवडणूक बिनविरोध होण्याची परंपरा यावेळी खंडीत झाली आहे. कारखान्याच्या १९ जागांसाठी २६ मे २०२६ पासून निवडणूक प्रक्रिया सुरु आहे. उमेदवारी अर्ज माघारी घेण्याची १८ जून पर्यंत मुदत होती. सर्वसाधारण उत्पादक व्यक्ती सभासदांनी निवडून द्यावयाचे प्रतिनिधी मतदारसंघातून कासार पिंपळगाव गटातील दोन जागेसाठी सत्ताधारी गटातून आप्पासाहेब दादाबा राजळे, उद्धव रघुनाथ वाघ व विरोधी गटाचे शिवशंकर अर्जुन राजळे यांचे अर्ज राहील्याने येथे २६ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ५ यावेळेत बॅलेट पेपरवर मतदान होणार आहे. सेवा सोसायटी मतदार संातील मतदार वगळता ८७०८ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदानानंतर २७ जून २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणूक बिनविरोध होण्यासाठी सत्ताधारी गटाकडून मोठे प्रयत्न झाले. मात्र शिवशंकर राजळे यांचा अर्ज राहिल्याने दोन जागांसाठी मतदान होणार आहे. शिवशंकर राजळे हे माजी आ. आप्पासाहेब राजळे यांचे पुतणे असून उद्धवराव वाघ यांचे मावस पुतणे आहेत. यामुळे ही लढत दोघां काकां विरोधात पुतण्या अशी होणार आहे.

कासार पिंपळगाव गट वगळता बिनविरोध निवडून आलेल्या संचालक पुढील प्रमाणे– सर्वाधारण उत्पादक व्यक्ती सभासदांनी निवडून द्यावयाचे प्रतिनिधी मतदारसंघातून चितळी गट– सुभाष बाबुराव ताठे, अनिल शिवाजी फलके. कोरडगाव गट– श्रीकांत एकनाथ मिसाळ, नारायण लक्ष्मण काकडे, बाबासाहेब रंगनाथ किलबिले. पाथर्डी गट– रामकिसन काशिनाथ काकडे, सुभाष मारुती बुधवंत. मिरी गट– यशवंत निवृत्ती गवळी, सुरेश एकनाथ आठरे. टाकळीमानूर गट– शेषराव सुर्यभान ढाकणे, बाळासाहेब भगवान गोल्हार यांचा समावेश आहे.

तर कारखाना कार्यक्षेत्रातील सभासद सहकारी संस्था व बिगर उत्पादक संस्था मतदार संघातून राहुल आप्पासाहेब राजळे, अनुसूचित जाती–जमाती मतदारसंघातून काकासाहेब मुरलीधर शिंदे, महिला प्रतिनिधी मतदारसंघातून सिंधूबाई महादेव जायभाये, मोनिका राजीव राजळे, इतर मागास वर्गीय मतदारसंघातून बापुसाहेब पाराजी पाटेकर, भटक्या विमुक्त जाती व जमाती, विशेष मागास प्रवर्ग मतदारसंघातून संदीप बाजीराव लोखंडे असे एकुण १७ संचालक बिनविरोध निवडून आले आहेत.

यावेळी सत्ताधारी गटाकडून सुरेश आठरे, बापुसाहेब पाटेकर व संदीप लोखंडे या नवीन चेहऱ्यांना संधी दिली असून उर्वरीत सर्व विद्यमान संचालक आहेत. कारखाना निवडणुकीसाठी मुख्य निवडणूक अधिकारी म्हणुन प्रांताधिकारी प्रसाद मते हे काम पहात असून त्यांना तहसीलदार उद्धव नाईक, नायब तहसीलदार सानप आदी सहाय्यक म्हणुन काम पहात आहेत.

## 'ज्ञानेश्वर'च्या बिनविरोध निवडणुकीचे सभासदांकडून नरेंद्र घुलेंना वाढदिवसाचे गिफ्ट

**घुले बंधूंवर सभासदांनी दाखवला विश्वास । यावेळीही बिनविरोधची परंपरा कायम**



● **नेवासा । वीरभूमी**– तालुक्यातील भेंडा येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याची निवडणूक अखेर बिनविरोध पार पडली आहे. त्यातच १९ जून रोजी नरेंद्र पाटील घुले यांचा वाढदिवस असल्याने सभासदांच्या वतीने त्यांना बिनविरोध निवडणुकीचे गिफ्ट मानले जात आहे. कारखाना सभासदांनी पुन्हा एकदा नरेंद्र पाटील घुले व चंद्रशेखर घुले पाटील या दोन्ही बंधूवर विश्वास दाखवत कारखाना निवडणूक बिनविरोध केली आहे.

कारखान्याच्या २१ जागांसाठी एकुण २४० इच्छुकांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. छाननीमध्ये ८९ अर्ज अवैध तर १५१ अर्ज वैध ठरले होते. इच्छुकांची संख्या जास्त असल्याने कोणाची माघार होणार व कोणाला संधी मिळणार, याकडे लक्ष लागले होते. मात्र घुले बंधूंनी आपले राजकीय कसब दाखवत उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवसापर्यंत तब्बल १३० उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले. विशेष म्हणजे आ. विठ्ठलराव लंघे गटाकडून दाखल केलेले सर्व अर्ज मागे घेतल्याने बिनविरोधचा मार्ग मोकळा झाला व सर्वच्या सर्व २१ जागा बिनविरोध निवडून आल्या.

यावेळी घुले बंधूंनी १३ नवीन चेहऱ्यांना संधी दिली असून माजी आ. पांडुरंग अभंग यांच्या ऐवजी त्यांचे नातू अमोल अभंग तर देसाई देशमुख यांच्या ऐवजी त्यांचा मुलगा हिंमतसिंह देशमुख यांना संधी दिली आहे.

बिनविरोध निवडून आलेले संचालक पुढील प्रमाणे – सर्वाधारण उत्पादक व्यक्ती सभासदांनी निवडून द्यावयाचे प्रतिनिधी मतदारसंघातून शेवगाव गटातून सुधाकर नारायणराव नरवडे, पंडीत रामभाऊ भोसले, रामनाथ नामदेव राजापुरे, शहरटाकळी गटातून नरेंद्र मारुतराव घुले, चंद्रशेखर मारुतराव घुले, बाळासाहेब बापुसाहेब खरड, कुकाणा गटातून नारायण कारभारी म्हस्के, हिंमतसिंह देसाई देशमुख, अमोल विठ्ठल पांडुरंग, नेवासा गटातून जनार्दन कचरु शेळके, दादासाहेब गुलाबराव कोकणे, वडाळा गटातून जनार्दन रामभाऊ कदम, प्रसाद जनार्दन पटारे, ढोरजळगाव गटातून मच्छिंद्र सूर्यभान म्हस्के, गोरक्षनाथ विठ्ठल भेंडेकर यांचा समावेश आहे.

तर कारखाना कार्यक्षेत्रातील सभासद सहकारी संस्था व बिगर उत्पादक संस्था मतदार संघातून बबनराव मुरलीधर भुसारी, अनुसूचित जाती–जमाती मतदारसंघातून विकास चंद्रभान नन्नवरे, महिला प्रतिनिधी मतदारसंघातून सुमनबाई दत्तात्रय काळे, रंजना अशोक तानवडे, इतर मागास वर्गीय मतदारसंघातून संतोष शंकरराव पावसे, भटक्या विमुक्त जाती व जमाती, विशेष मागास प्रवर्ग मतदारसंघातून अशोक लक्ष्मण मिसाळ असे एकुण २१ संचालक बिनविरोध निवडून आले आहेत.

कारखाना सभासदांनी पुन्हा एकदा घुले बंधूंवर विश्वास दाखवत निवडणूक बिनविरोध केली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणुन जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी काम पाहिले तर सहाय्यक निबंधक देविदास घोडेचोर यांनी त्यांना सहाय्य केले.

# लिंग गुणोत्तर सुधारण्यासाठी ११ कलमी कृती आराखडा प्रभावीपणे राबवा

**जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया । ८०० पेक्षा कमी लिंग गुणोत्तर असलेल्या ४४ गावांसाठी विशेष कार्यशाळा**

● **अहिल्यानगर । वीरभूमी**– जिल्ह्यातील लिंग गुणोत्तरात वाढ झाली असली तरी ते अद्याप समाधानकारक नाही. त्यामुळे ८०० पेक्षा कमी लिंग गुणोत्तर असलेल्या ४४ गावांतील प्रतिनिधींनी ग्रामस्थांच्या सहभागातून ११ कलमी कृती आराखडा प्रभावीपणे राबवून मुलींच्या जन्माविषयी समाजात सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातून दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित विशेष कार्यशाळेत ते बोलत होते.

यावेळी पीसीपीएनडीटी राज्य पर्यवेक्षण मंडळाच्या सदस्या डॉ. सुधा कांकरिया, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घोगरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे, निवासी वैद्यकीय अधिकारी शिवशंकर वलांडे, ॲड. सारिका सुराशे तसेच अहिल्यानगर, नेवासा, श्रीगोंदा, संगमनेर, राहाता, श्रीरामपूर, पारनेर, पाथर्डी, राहुरी, शेवगाव, अकोले, जामखेड, कर्जत आणि कोपरगाव तालुक्यांतील सरपंच, तलाठी, पोलीस पाटील, आशा व अंगणवाडी सेविका, तालुका आरोग्य अधिकारी आणि गटविकास अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले की, मुलींचा जन्मदर वाढविण्यासाठी पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे. ज्या गावांमध्ये लिंग गुणोत्तरात सकारात्मक बदल दिसून येईल, त्या गावांचा प्रशासनातर्फे सन्मान करण्यात येईल.

पीसीपीएनडीटी राज्य पर्यवेक्षण मंडळाच्या सदस्या डॉ. सुधा कांकरिया यांनी स्त्रीभ्रूणहत्येची कारणे आणि प्रतिबंधात्मक उपाय याविषयी दृकश्राव्य सादरीकरणाद्वारे मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या की, चिमुकलीचा जीव वाचविण्यासाठी सर्व स्तरांवर प्रयत्न होणे गरजेचे आहे. गर्भवती महिलांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून देतानाच गर्भरक्षणाविषयी जागृती करणे आवश्यक आहे.



आशा व अंगणवाडी सेविकांनी 'मैत्री' योजनेच्या माध्यमातून ज्या महिलांना आधीच मुली आहेत आणि त्या पुन्हा गर्भवती आहेत, त्यांच्याशी विश्वासाचे नाते निर्माण करावे. त्यामुळे कुटुंबात मुलगी नको या मानसिकतेतून बेकायदेशीर लिंगनिदानाचा विचार झाल्यास त्यापासून परावृत्त करणे सोपे जाईल. आई व बाळाच्या आरोग्यासाठी उपयुक्त असलेले सोनोग्राफी यंत्र स्त्रीभ्रूणहत्येचे साधन ठरू नये, यासाठी जागरूक राहून कायद्याच्या अंमलबजावणीस सहकार्य करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे यांनी प्रास्ताविक केले. निवासी वैद्यकीय अधिकारी शिवशंकर वलांडे यांनी आभार मानले.

### चिमुकलीचा जीव वाचविण्यासाठी ११ कलमी कृती आराखडा

■ गावातील लिंग गुणोत्तराचा अभ्यास करून त्याची माहितीफलकावर नोंद करणे, ग्रामसभेत स्त्रीजन्म स्वागताचा ठराव मंजूर करणे, गर्भवती महिलांचे नियमित आरोग्य निरीक्षण करून 'मैत्री' योजना राबविणे, कायद्याविषयी जनजागृती करणे, 'कन्याजन्मानंद सोहळा' साजरा करणे, फक्त मुली असलेल्या कुटुंबांचा सन्मान करणे, विवाह सोहळ्यांमध्ये स्त्रीजन्म स्वागताचा 'आठवा फेरा' घेणे, 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' आणि 'जननी सुरक्षा' यांसह विविध शासकीय योजनांचा लाभ देणे, युवकांचा सहभाग वाढविणे, 'मुलगी परके धन नसून पणती दोन्ही घरांना उजेड देते' हा विचार रुजविणे आणि सामूहिक शपथ घेणे या अकरा बाबींचा आराखड्यात समावेश आहे.

SPOT NEWS



## आमदार अमोल खताळ यांनी घेतले अण्णा हजारे यांचे आशीर्वाद

● **पारनेर । वीरभूमी –**
संगमनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमोल खताळ यांनी शुक्रवारी आदर्श गाव राळेगणसिद्धी येथे ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णा हजारे यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान मतदारसंघातील विकासकामे तसेच लोकप्रतिनिधींची जबाबदारी यावर दोघांमध्ये सविस्तर चर्चा झाली. यावेळी आमदार अमोल खताळ यांनी अण्णा हजारे यांच्या पायाला स्पर्श करून त्यांचे आशीर्वाद घेतले. अण्णा हजारे यांनी त्यांच्या कामाचे कौतुक करत मोलाचे मार्गदर्शन केले. राजकारणात काम करताना लोकहिताला प्राधान्य द्या. प्रामाणिकपणे केलेले प्रयत्न कधीही वाया जात नाहीत. जनतेची सेवा हेच परम कर्तव्य मानून शेवटच्या घटकापर्यंत विकासाचा लाभ पोहोचवा, असा सल्ला अण्णा हजारे यांनी दिला. अण्णांच्या मार्गदर्शनाबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना आमदार अमोल खताळ म्हणाले, अण्णांचे विचार हे आम्हा तरुण लोकप्रतिनिधींसाठी दीपस्तंभासारखे आहेत. त्यांच्या आशीर्वादाने आणि नैतिकतेच्या मार्गावर चालूनच मला संगमनेर मतदारसंघाचा सर्वांगीण विकास साधायचा आहे. अण्णांनी दिलेल्या शब्दांमुळे अधिक जबाबदारीने आणि पूर्ण निष्ठेने काम करण्याची नवी ऊर्जा मिळाली आहे. ही सदिच्छा भेट सकारात्मक वातावरणात पार पडली. या भेटीमुळे मतदारसंघातील विकासकामांना गती देण्याबरोबरच साधेपणा, पारदर्शकता आणि जनहिताच्या भावनेने काम करण्याचा निर्धार अधिक दृढ झाल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

## हक्काचे पाणी घालवणाऱ्या विरोधकांनी आत्मपरीक्षण करावे : वैशाली वाजे

● **कोपरगाव । वीरभूमी –**
शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या साठवण तलावातील पाणीसाठा



तळाला गेल्याने नागरिकांनी पाणी जपून वापरणे ही काळाची गरज आहे. धरणातील उपलब्ध पाणीसाठा कमी झाल्यामुळे पुढील आवर्तन होईपर्यंत तसेच नैसर्गिकरीत्या धरणांमध्ये पाण्याची उपलब्धता वाढेपर्यंत काटकसरीने पाण्याचा वापर करणे आवश्यक आहे. या वस्तुस्थितीला विरोधकांकडून राजकीय रंग देण्याचा प्रयत्न होत असून तो दुर्दैवी असल्याची टीका पाणीपुरवठा सभापती वैशाली वाजे यांनी केली आहे. पाणीपुरवठ्याबाबत बालिश प्रश्न उपस्थित करणाऱ्या विरोधकांनी प्रथम आपल्या कारकिर्दीतील कामगिरीचे आत्मपरीक्षण करावे. त्यांच्या नेत्यांच्या कार्यकाळाच्या तुलनेत आज नागरिकांना अधिक चांगल्या दर्जाचे व नियोजनबद्ध पाणी मिळत असल्याचे वास्तव आहे. केवळ राजकीय टीका करण्यापेक्षा वस्तुस्थितीचा अभ्यास करणे विरोधकांसाठी गरजेचे असल्याचे वाजे यांनी म्हटले आहे. तालुक्याचे हक्काचे पाणी घालविण्याचा इतिहास ज्यांच्या नेतृत्वाशी जोडला गेला, त्यांनी आज पाणीप्रश्नी भाष्य करणे हे आश्चर्यकारक आहे. समन्यायी पाणी वाटपाच्या नावाखाली शेती व पिण्याच्या पाण्याचे मोठे नुकसान झाले. त्यामुळे संपूर्ण तालुक्याला पाणीटंचाईच्या संकटाचा सामना करावा लागला होता आजही त्याचे दुष्परिणाम भोगावे लागत आहे. दुर्दैवाने आ. आशुतोष काळे यांच्या काळातही दुर्लक्षामुळे तालुक्याच्या पाण्याच्या आरक्षणात घट झाल्याचे प्रकार घडले असून त्याचे परिणाम भविष्यात नागरिकांना भोगावे लागू शकतात, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली. स्वतःच्या चुका आणि अपयश झाकण्यासाठी सत्ताधाऱ्यांवर आरोप करण्याची विरोधकांची पद्धत आता जनतेला चांगलीच समजली आहे. स्वतः पाप करायचे आणि त्याचे खापर इतरांवर फोडायचे, ही नीती आता चालणार नाही. पाणीप्रश्नी जनतेची दिशाभूल करणाऱ्या विरोधकांना नागरिक योग्य वेळी उत्तर देतील, असा परखड टोला पाणीपुरवठा सभापती वैशाली वाजे यांनी लगावला.

## माहिती अधिकारातील नव्या नियमांविरोधात २६ जूनला अहिल्यानगरात 'राष्ट्रीय सूर्यनामा'

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**
माहिती अधिकार कायद्यात नव्याने काही नियम व अटी समाविष्ट करून नागरिकांना माहिती मिळण्यापासून आणि अपील प्रक्रियेपासून दूर ठेवण्याचे षडयंत्र रचले जात असल्याचा गंभीर आरोप पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेच्या वतीने करण्यात आला आहे. माहिती अधिकार कायद्याचे संरक्षण, नागरिकांच्या लोकशाही हक्कांचे जतन आणि पारदर्शक, उत्तरदायी शासनव्यवस्थेच्या मागणीसाठी शुक्रवार, दि. २६ जून रोजी सकाळी ११ वाजता अहिल्यानगर येथील हुतात्मा स्मारक परिसरात आंदोलन होणार आहे.

# कोसेगव्हाण येथील बारव शिलालेख उजेडात

### पवार घराण्याचा श्रीगोंदा तालुक्यातील एकमेव शिलालेख

■ **विजय उंडे**

● **श्रीगोंदा । वीरभूमी –**
अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील मौजे कोसेगव्हाण गावात मुख्य रस्त्यालगत एका बारवेत हा शिलालेख आहे. ही बारव सध्या पूर्णपणे बुजून गेली आहे. स्थानिक ग्रामस्थांनी लेख बारवे शेजारी असलेल्या एका दगडी बांधकामाच्या मारुतीच्या मंदिरात भिंतीत सध्या बसवलेला आहे. हा शिलालेख हा उठावाच्या स्वरूपाचा असून ६ ओळीचा देवनागरी लिपीतील शुद्ध मराठी भाषेत कोरलेला आहे. शिलालेख अनेक वर्ष उघड्यावर असल्याने त्यावर वातावरणाचा परिणाम झाला असून लेखातील काही अक्षरे झिजून पुसट झाली आहेत तर लेखावर केलेल्या रंगरंगोटीमुळे काही अक्षरे खराब झाली आहेत. लेखाचा छाप घेतला असता त्यावरील मजकूर सहज वाचता येतो.

**शिलालेखाचे वाचन**
**१ स्वस्ति श्री नृप शालिवाहन शके१७३४**
**२.अंगिरा नाम सवछरे मार्गेश्वर व**
**३. द्य त्रयोदसी तदिनी गंगा भा**
**४.गिर्थी लक्ष्मीबाई पवार यांनी**
**५.हे बारवेचे काम ईश्वर पर**
**६. यणे संकल्प करून केले आसे.**
**या शिलालेखाचे संशोधन राजेश इंगळे तर शिलालेखाचा वाचन अनिल दुधाणे यांनी केले आहे.**
**अर्थ** : शालिवाहन शकाच्या शके१७३४ अंगिरा नाम सवछरे मार्गेश्वर वद्य त्रयोदसी म्हणजेच गुरूवार ३१





डिसेंबर १८१२च्या दिवशी पवार कुळातील लक्ष्मीबाई पवार यांनी बारव आपले कुलदैवत किंवा तेथील स्थानिक दैवत यांच्याशी ईश्वर कृपेने प्रयत्न करून ती बारव बांधली किंवा तिचे बांधकाम पूर्ण केले.

गंगा व भागीरथी हे कुंड किंवा बारवेचे नाव नसून लक्ष्मीबाई पवार यांच्या नावापुढे लावलेले विशेषण आहे. विधवा स्त्रियांच्या नावापुढे गंगाभागीरथी हा शब्द येत असे..

**शिलालेखाचे महत्व** : हा शिलालेख शालिवाहन शक १७३४ इ.स. १८१२ च्या आसपास या काळातील असून मराठा उत्तरकालीन समाजजीवन, जलव्यवस्था आणि पवार कुळाच्या इतिहासाचा महत्त्वपूर्ण पुरावा आहे. शिलालेखात अंगिरा नाम संवत्सर, मार्गशीर्ष वद्य त्रयोदशी या दिवशी गंगाभागीरथी लक्ष्मीबाई पवार यांनी बारव, पायऱ्यांची विहीर बांधण्याचे कार्य ईश्वराला अर्पण करण्याच्या संकल्पाने पूर्ण केले असल्याची नोंद आहे.या लेखावरून तत्कालीन समाजातील जलव्यवस्थेचे महत्त्व स्पष्ट होते. बारव ही केवळ पाण्याची सोय नसून सार्वजनिक उपयोग, धार्मिक पुण्य आणि लोककल्याणाचे साधन मानली जात असे. एका महिलेने पुढाकार घेऊन बारवसारखे जलतीर्थ निर्माण करणे आणि त्याची माहिती शिलालेखाद्वारे कायमस्वरूपी नोंदवणे ही विशेष बाब आहे.

पवार कुळातील शिलालेखांची संख्या अत्यल्प असून सुपे, पंढरपूर यांसारख्या ठिकाणी पवार घराण्याशी संबंधित लेख आढळतात. पवार वंशाची प्रमुख परंपरा धारच्या गादीशी संबंधित मानली जाते. पवार घराण्याच्या थोरल्या देवास व धाकट्या धार अशा दोन प्रमुख शाखा आहेत. पवार कुळाचे गोत्र वशिष्ठ, देवक धारेचे शस्त्र आणि निशाण लाल ध्वजावर हनुमान चिन्ह अशी पारंपरिक ओळख सांगितली जाते. धार येथून महाराष्ट्रात आल्यानंतर पवार घराण्याचे वास्तव्य प्रथम नगर जिल्ह्यातील सुपे येथे झाले. त्यानंतर पुणे जिल्ह्यातील मलठण, वाघाळे, अमदाबाद, कवठे, हिंगणी, पाथरे, वरडे, चिथणी इत्यादी गावांत त्यांचा विस्तार झाला. पुढे कोकण आणि खानदेश भागातही पवार घराण्याचा प्रभाव वाढला. खानदेशातील नगरदेवळा येथे पवारांना जहागिरी मिळाल्याचा उल्लेख आढळतो.पवारांच्या प्राचीन इतिहासातही त्यांचा उल्लेख आढळतो. शके १०६८ च्या भांदक शिलालेखात धर्माचे राए पवार असा उल्लेख येतो, तसेच पवार राजांसाठी विख्यातो जगदेवो जनाधीप असा गौरवपूर्ण उल्लेख आढळतो. यावरून पवार घराण्याची धार्मिक, सामाजिक आणि राजकीय परंपरा प्राचीन असल्याचे दिसून येते.


शिलालेखाचे संशोधन राजेश इंगळे,

शिलालेखाचे वाचन, माहिती व संकलन अनिल दुधाणे यांचे असून सदर शिलालेख शोधकार्य छाप व फोटो घेण्यास शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशन संस्थेच्या वतीने राजेश इंगळे, गणेश कुदांडे, मारूती वागस्कर व कोसेगव्हाण ग्रामस्थांनी सहकार्य केले.

> लक्ष्मीबाई पवार यांचा हा शिलालेख अत्यंत महत्त्वाचा ठरतो. आपल्या पूर्वजांच्या लोककल्याणकारी परंपरेप्रमाणे त्यांनी समाजाच्या उपयोगासाठी बारव बांधली. यातून स्त्रियांचे सामाजिक योगदान, दानधर्माची परंपरा, जलसंवर्धनाची जाणीव आणि धार्मिक भावना स्पष्ट होतात. म्हणून हा शिलालेख केवळ एका बारव बांधकामाची नोंद नसून पवार कुळाचा इतिहास, स्त्री-कर्तृत्व, मराठाकालीन जलसंस्कृती आणि स्थानिक सामाजिक जीवनाचा दुर्मिळ ऐतिहासिक दस्तऐवज आहे.
> – **अनिल दुधाणे,** शिलालेख वाचक, पुणे

## विद्यार्थीहितासाठी एस. एस. जी. एम. महाविद्यालयात भव्य इमारत उभारणार

● **कोपरगाव । वीरभूमी –**
रयत शिक्षण संस्थेच्या एस. एस. जी. एम. महाविद्यालय, कोपरगाव येथे महाविद्यालय विकास समितीचे नवनियुक्त अध्यक्ष ॲड. संदीप वर्पे यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालय विकास समितीची बैठक संपन्न झाली. या बैठकीत महाविद्यालयाच्या नूतन इमारतीच्या विस्ताराचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.



विद्यार्थ्यांची वाढती संख्या तसेच नव्याने सुरू करण्यात आलेल्या अभ्यासक्रमांच्या पार्श्वभूमीवर सध्या अस्तित्वात असलेल्या २० हजार चौरस फूट क्षेत्रफळाच्या इमारतीवर प्रस्तावित अतिरिक्त १० हजार चौरस फूट क्षेत्रफळाचा दुसरा मजला बांधण्यास समितीने मंजुरी दिली. या प्रकल्पासाठी रयत शिक्षण संस्था व संबंधित प्रशासकीय यंत्रणांकडून आवश्यक परवानगी व मान्यता प्राप्त करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

महाविद्यालयात अलीकडेच एम.एस्सी. (झूलॉजी), एम.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) तसेच बी.एस्सी. सायबर सिक्युरिटी हे नवे अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. विविध रोजगाराभिमुख व कौशल्याधारित कोर्सेस या अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांचा वाढता प्रतिसाद मिळत असल्याने अतिरिक्त वर्गखोल्या, प्रयोगशाळा आणि शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक बनले आहे. दुसरा मजला पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना अधिक प्रशस्त वर्गखोल्या, अद्ययावत प्रयोगशाळा आणि आधुनिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक विकासाला गती मिळण्यासह विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी पोषक वातावरण निर्माण होणार आहे.

या बैठकीसाठी महाविद्यालय विकास समितीचे सचिव प्राचार्य डॉ. माधव सरोदे, सदस्य सुनील गंगुले, बाळासाहेब आव्हाड, महेंद्रशेठ काले, महाविद्यालयातील इमारत बांधकाम समितीचे चेअरमन डॉ. बंडेराव तऱ्हाळ, डॉ. माधव यशवंत, डॉ. देविदास रणधीर, डॉ. प्रतिभा रांधवणे, डॉ. निलेश मालपुरे, कार्यालय अधीक्षक सुनील गोसावी आदी उपस्थित होते. महाविद्यालयाच्या या पायाभूत सुविधा विस्ताराने विद्यार्थ्यांच्या भौतिक सुविधांमध्ये वाढ होणार आहे.

## पारनेर तालुक्यातील करंदी सोसायटी सभासदाच्या जमिनीवर परस्पर ९.१० लाखांचा बोजा

### बनावट सह्यांद्वारे फेरफार नोंद । चेअरमन व सचिवांविरोधात कारवाईची मागणी

● **पारनेर । वीरभूमी –**
पारनेर तालुक्यातील करंदी येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा प्रकार समोर आला आहे. एका सभासदाने कोणतेही कर्ज न घेतलेले असताना त्यांच्या शेतजमिनीवर परस्पर ९ लाख १० हजार रुपयांचा बोजा चढविण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी सोसायटीचे चेअरमन आणि सचिवांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी संबंधित सभासदाने पारनेर पोलिसांकडे केली आहे.

पाटीलबा जबाजी ठाणगे (रा. करंदी, ता. पारनेर) यांनी दिलेल्या ऑनलाइन तक्रारीनुसार, ते करंदी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे सभासद आहेत. त्यांनी कोणत्याही प्रकारच्या कर्जासाठी अर्ज केलेला नसतानाही, १६ जून २०२६ रोजी मौजे करंदी येथील गट क्रमांक ५१६ व ६२० या शेतजमिनीवर फेरफार क्रमांक ४१५९ अन्वये ९ लाख १० हजार रुपयांचा बोजा नोंदविण्यात आला.

या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर पाटीलबा ठाणगे यांनी करंदी येथील तलाठी कार्यालयात जाऊन संबंधित कागदपत्रांची मागणी केली. त्यावेळी धक्कादायक बाब समोर आल्याचा दावा त्यांनी केला आहे. तक्रारदाराने कोणताही कर्ज करार (इकरार) केलेला नसतानाही, सोसायटीचे चेअरमन प्रकाश कोंडीबा ठाणगे आणि सचिव अविनाश बबन जोशी यांनी स्वतः इकरार फॉर्म भरून त्यावर दोन साक्षीदारांची नावे नमूद केली. तसेच संबंधित सभासदाच्या बनावट सह्या करून पीडीई युजर लॉगिनद्वारे ऑनलाइन नोंदणी करण्यात आल्याने फेरफार क्रमांक ४१५९ तयार झाल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी अधिकाराचा गैरवापर करून संगनमताने फसवणूक केल्याचा आरोप पाटीलबा ठाणगे यांनी केला आहे. या प्रकारामुळे सोसायटीच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून सभासदांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर तातडीने कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी पाटीलबा ठाणगे यांनी पारनेर पोलिस ठाण्यात ऑनलाइन तक्रारीद्वारे केली आहे. दरम्यान, या प्रकरणात पोलिस काय भूमिका घेतात, याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## शिवसेनेच्या ६० व्या वर्धापन दिनानिमित्त निराधार मुलांना किराणा साहित्य व खाऊचे वाटप

● **शेवगाव । वीरभूमी–**
हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना सर्वसामान्य जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होत समाजसेवेचा वसा जपत आहे. शिवसेनेचा वर्धापन दिन हा केवळ उत्सव नसून गरजू, वंचित आणि निराधार बांधवांच्या जीवनात आनंद निर्माण करण्याचा संकल्प आहे, असे प्रतिपादन शिवसेना नेते अरुण मुंढे यांनी केले.

शिवसेनेच्या ६० व्या वर्धापन दिनानिमित्त शेवगाव शहरातील उचल फाउंडेशन येथे निराधार व गरजू मुलांसाठी सेवाभावी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुलांना किराणा साहित्य तसेच खाऊचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी अरुण मुंढे बोलत होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी शिवसेनेच्या सहा दशकांच्या संघर्षमय, जनहितवादी आणि समाजाभिमुख कार्याचा गौरव केला. समाजातील निराधार घटकांना आधार देण्यासाठी प्रत्येकाने आपल्या परीने योगदान देण्याची गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. या उपक्रमामुळे मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि समाधान हेच कार्यक्रमाचे खरे यश असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.



याप्रसंगी उचल फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. संजय लड्डा, सचिन खेडकर, शिवसेनेचे नगरसेवक आशुतोष डहाळे, सुनील काकडे, साईनाथ आघाट, रोहित काथवटे, सालारभाई शेख, प्रेमभाऊ जाजू, राजेंद्र तरटे, माजी नगरसेवक दिगंबर तात्या काथवटे, अंकुश कुसळकर, विजुभाऊ धनवडे, कानिफ साखरे, अशोक आघाट, सुनील जगताप, अभय पालवे, अभिषेक गालफाडे, विशाल आव्हाड, नानाभाऊ कर्डिले, नंदू वाघमारे यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते, शिवसैनिक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी पाण्याचा काटकसरीने वापर करणे काळाची गरज

### पालकमंत्री डॉ राधाकृष्ण विखे । आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह व जिल्हा ग्रंथालयाच्या डिजिटल उपकेंद्राच्या इमारतीचा लोकार्पण सोहळा

● **शिर्डी । वीरभूमी –**
भविष्यातील वाढते जलदुर्भिक्ष लक्षात घेता प्रत्येक नागरिकाने, विशेषतः वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी, पाण्याचा नियोजनबद्ध व काटकसरीने वापर करणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज येथे केले.

लोणी (हसनापूर) येथे नवनिर्मित आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह व जिल्हा ग्रंथालयाच्या डिजिटल उपकेंद्राच्या इमारतीच्या लोकार्पणप्रसंगी श्री. विखे पाटील बोलत होते. याप्रसंगी माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, आदिवासी विकास विभागाचे सहआयुक्त स्वप्निल साबळे, राजूर प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, कार्यकारी अभियंता बाळासाहेब ननवरे, उपअभियंता मयूर मुनोत, उपअभियंता सचिन वंजारी, प्रवरा अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मगरे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले की, राज्यातील तिसरे डिजिटल ग्रंथालय उपकेंद्र लोणी-हसनापूर परिसरासाठी मानबिंदू ठरणार असून, स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ते अत्यंत उपयुक्त ठरेल. या आधुनिक इमारतीसाठी जिल्हा नियोजन मंडळातून पाच कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, येथे दूरदृश्य प्रणालीसह विविध अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

सध्या पावसाअभावी धरणे रिकामी होत चालली असून, पिण्याच्या पाण्याचे नियोजन ऑगस्टवरून आता सप्टेंबरपर्यंत वाढवावे लागले आहे. या पार्श्वभूमीवर पाण्याचा पुनर्वापर वाढविण्यासाठी या इमारतीत जलपुनर्वापर व सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारावी. वसतिगृहांमध्ये पाण्याचा अपव्यय तसेच नळ किंवा काचा फोडण्याच्या प्रवृत्तींना आळा बसला पाहिजे. ही मालमत्ता शासनाची असली तरी ती जनतेच्या पैशातून उभारलेली असल्याने जनतेचीच संपत्ती आहे. या सर्व परिस्थितीसाठी केवळ विद्यार्थ्यांना दोष न देता प्रशासनातील अधिकाऱ्यांनीही संवेदनशील राहून मुलांच्या दैनंदिन अडचणी समजून घेतल्या पाहिजेत, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

विद्यार्थ्यांच्या समस्या वेळेवर सोडवल्यास त्यांच्यावर संप करण्याची किंवा 'लाँग मार्च' काढण्याची वेळ येणार नाही. प्रशासन संवेदनशील राहिल्यास विद्यार्थीही प्रशासनाला सहकार्य करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी समाजकल्याण व आदिवासी विकास विभागाने संयुक्तपणे ५०० विद्यार्थ्यांच्या क्षमतेचे सभागृह उभारावे, जे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांसाठी उपयुक्त ठरेल, असे त्यांनी सुचवले. तसेच मुला-मुलींचे मानसिक आरोग्य व शारीरिक तंदुरुस्ती उत्तम राहण्यासाठी सुसज्ज व्यायामशाळा उभारण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. आदिवासी समाजातील मुली शिक्षणात व गुणवत्तेत आघाडीवर असल्याबद्दल त्यांनी विशेष समाधान व्यक्त केले.

ग्रंथालय संचालक श्री. गाडेकर म्हणाले की, राज्यातील तिसरे जिल्हा ग्रंथालय उपकेंद्र पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पुढाकाराने राहाता तालुक्यात सुरू होत असून, याद्वारे विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची पुस्तके, संगणक, डिजिटल व छापील साहित्य उपलब्ध होणार आहे. विद्यार्थ्यांनी या सुविधेचा पुरेपूर लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.



महानगरपालिकेच्या माध्यमातून अहिल्यानगर येथे उभारण्यात येत असलेल्या जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्या स्वतंत्र इमारतीचे काम अंतिम टप्प्यात असून, ही भव्य वास्तू जिल्ह्याच्या वैभवात भर घालेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अहिल्यानगर जिल्ह्यात शतकोत्तर परंपरा असलेली सुमारे ४८० ग्रंथालये असून येथील वाचन चळवळ अतिशय गतिमान असल्याचे श्री. गाडेकर म्हणाले.

राज्य शासनाच्या सकारात्मक निर्णयामुळे १६ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या राज्य ग्रंथालय परिषदेची स्थापना झाली असून, त्यामुळे अनेक प्रश्न मार्गी लागण्यास मदत होईल, असेही श्री. गाडेकर यांनी सांगितले.

प्रास्ताविकात श्रीमती बोकडे म्हणाल्या की, आदिवासी मुलांच्या शासकीय वसतिगृहाची प्रवेश क्षमता ७५ वरून १५० विद्यार्थ्यांपर्यंत वाढविण्यात आली आहे. या नूतन इमारतीत प्रत्येक मजल्यावर अभ्यासिका तसेच निवासासाठी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के यांनीही मनोगत व्यक्त केले.

SPOT NEWS

## श्री स्वामी समर्थ विद्यालयात शाळा प्रवेशोत्सव उत्साहात

**अकोले । वीरभूमी –**

विद्यार्थ्यांनी मन लावून अभ्यास करावा, चांगले संस्कार जोपासावेत आणि आपल्या कार्यातून नावलौकिक मिळवावा, असे प्रतिपादन माजी केंद्रप्रमुख विठ्ठल कोरडे यांनी केले. राजूर येथील श्री स्वामी समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आयोजित शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कोकण कला व शिक्षण विकास संस्था, मुंबईचे सदस्य स्वप्निल काळे होते. प्रमुख अतिथी म्हणून माजी केंद्रप्रमुख विठ्ठल कोरडे, संगीता बोटे यांच्यासह पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी मनोगत व्यक्त करताना विठ्ठल कोरडे यांनी विद्यालयाच्या आजवरच्या प्रगतीचा गौरव केला. विद्यालयाने उत्कृष्ट निकाल, विज्ञान प्रदर्शनातील दैदिप्यमान यश तसेच कला क्षेत्रातील विविध उपक्रमांच्या माध्यमातून नावलौकिक मिळविला असून, ही अभिमानास्पद बाब असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्वप्निल काळे यांनी विद्यार्थ्यांनी नियमित शाळेत उपस्थित राहून ज्ञानार्जनावर भर द्यावा, असे आवाहन केले. ज्ञानदानाच्या माध्यमातून बौद्धिक क्षमतांचा विकास करावा. जगाच्या पाठीवर कुठेही गेलात तरी आपण कमी पडणार नाही, यासाठी वेळेचे नियोजन करून अभ्यास करावा आणि वर्गातील अध्यापनाकडे लक्ष द्यावे, असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी विद्यालयात नव्याने दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच कोकण कला व शिक्षण विकास संस्था, मुंबई यांच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आलेल्या शालेय साहित्याचे वितरण प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक किरण भागवत यांनी केले. सूत्रसंचालन विनायक साळवे यांनी केले, तर आभार दगडू टकले यांनी मानले.

## घाटघरच्या उंबरदऱ्यात कुजलेल्या अवस्थेत अज्ञात इसमाचा मृतदेह आढळला

**अकोले । वीरभूमी –**

अकोले तालुक्यातील घाटघर परिसरातील उंबरदऱ्यात एका अज्ञात इसमाचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याची माहिती सहायक पोलिस निरीक्षक किशोर पवार यांनी दिली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. राजूर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी वन विभागाचे अधिकारी महेंद्र पाटील व त्यांचे कर्मचारी या परिसरात गस्त घालत असताना त्यांना दुर्गंधी येऊ लागली. याबाबत त्यांनी तत्काळ राजूर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक किशोर पवार यांच्याशी संपर्क साधून माहिती दिली. मंगळवारी सकाळी सहायक पोलिस निरीक्षक पवार, पोलिस हवालदार संभाजी सांगळे, मुठे, जाधव तसेच इतर कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. त्यावेळी त्यांना पुरुष जातीचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आला. हा मृतदेह सुमारे वीस ते बावीस दिवसांपूर्वी येथे टाकण्यात आला असावा, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. मृत व्यक्तीचे वय अंदाजे ३० ते ३२ वर्षे असावे, असेही पोलिसांनी सांगितले. मृतदेह अत्यंत कुजलेल्या अवस्थेत असल्याने त्याची ओळख पटविण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर उभे राहिले आहे. विशेष म्हणजे, ज्या ठिकाणी हा मृतदेह सापडला ते क्षेत्र शहापूर तालुक्यातील किणवणी पोलिस ठाण्याच्या हद्दीत येत असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. त्यामुळे या प्रकरणाच्या तपासासाठी संबंधित पोलिस यंत्रणांमध्ये समन्वय सुरू आहे. दरम्यान, वैद्यकीय पथकाच्या मदतीने घटनास्थळीच मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले. काही महिन्यांपूर्वी भंडारदरा धरणाच्या पायथ्याजवळ एका अज्ञात महिलेचा सांगाडा आढळून आला होता. त्या प्रकरणाचा उलगडा अद्याप झालेला नसतानाच घाटघरच्या उंबरदऱ्यात पुन्हा एक अज्ञात मृतदेह सापडल्याने परिसरात भीती व चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. हा मृतदेह येथे कसा आला, त्यामागे घातपात आहे का, तसेच मृत व्यक्तीची ओळख काय, याचा तपास सहायक पोलिस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## निमगाव वाघा येथे जगद्गुरु संत तुकाराम महाराज ग्रामीण मराठी साहित्य संमेलन

**अहिल्यानगर । वीरभूमी –**

निमगाव वाघा (ता. नगर) येथे स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने २५ जुलै रोजी आषाढी एकादशी तसेच राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंतीनिमित्त 'जगतगुरु संत तुकाराम महाराज राज्यस्तरीय सातवे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन' आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये राज्यभरातील ज्येष्ठ साहित्यिक व कवी या सोहळ्यास उपस्थित राहणार असल्याची माहिती संमेलनाचे संयोजक पै. नाना डोंगरे यांनी दिली. संमेलनाच्या उद्घाटनाप्रसंगी गावातून विठ्ठल-रुक्मिणी, संत तुकाराम महाराज व राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमांसह ग्रंथ दिंडी काढली जाणार आहे. या दिंडीत बाल वारकरी यांच्यासह साहित्यिक व कवी देखील सहभागी होणार आहेत. यानंतर परिवार मंगल कार्यालयात मान्यवरांच्या हस्ते संमेलनाचे औपचारिक उद्घाटन होणार आहे. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत यांचे परिसंवाद आणि व्याख्याने होणार आहेत.

# आमदार व्हायचे असते तर दोन महिन्यांपूर्वीच झालो असतो

### डॉ. सुजय विखेंचा थेट इशारा । मेंदूचा डॉक्टर परत येतोय, मनोरुग्णांवर उपचार करणार

**लोणी । वीरभूमी–**

आज काही जण ज्या पदांचा आनंद घेत आहेत, ती पदे आम्ही स्वेच्छेने सोडून दिलेली आहेत. पद मिळाल्यानंतर त्याचा आनंद घ्यावा, परंतु त्यातून माज, अहंकार किंवा मगरुरी निर्माण होता कामा नये. लोकांनी दिलेल्या सन्मानाची जाणीव ठेवून काम करणे आवश्यक आहे. पद हे लोकांची कामे करण्यासाठी असते. समाजाच्या विकासासाठी आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी त्याचा उपयोग झाला पाहिजे असे डॉ. सुजय विखे पाटील यांनी ठणकावून सांगितले, लोणी येथे प्रवरा बँकेच्या यूपीआय बँकिंग सेवेच्या शुभारंभप्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

पुढे बोलताना डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले की, काही लोकांना कारखान्याचे चेअरमन व्हायचे असते, काहींना आमदार व्हायचे असते, तर काही जण विविध पदांसाठी धडपड करत असतात. मात्र आम्हाला आमदार व्हायचे असते, तर दोन महिन्यांपूर्वीच झालो असतो. पद मिळवणे हा आमचा उद्देश नाही. लोकांमध्ये जाण्यासाठी, त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होण्यासाठी आणि समाजकारण करण्यासाठी कोणत्याही पदाची गरज नसते. जनतेचा विश्वास आणि प्रेम हीच आमची सर्वात मोठी ताकद आहे.



राजकारणातील चढ-उतारांचा उल्लेख करताना त्यांनी आपल्या अनुभवांचाही संदर्भ दिला. पद यायला आणि जायला वेळ लागत नाही. मी स्वतः त्याचा जिवंत अनुभव घेतला आहे. त्यामुळे कोणत्याही पदाचा गर्व न करता जमिनीवर राहून काम केले पाहिजे. पद कायमस्वरूपी नसते, मात्र लोकांशी असलेले नाते कायम राहते. म्हणूनच जनतेचा विश्वास जपणे हे कोणत्याही पदापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे, असे त्यांनी सांगितले.

पुढे बोलताना ते म्हणाले विखे पाटील परिवाराच्या सामाजिक आणि राजकीय वाटचालीचा उल्लेख करताना ते म्हणाले की, गेल्या अनेक दशकांपासून जनतेने आमच्या परिवारावर प्रेम केले आहे. आजही आम्ही गावात गेलो की लोक आपुलकीने भेटतात, स्वागत करतात. हे प्रेम आणि विश्वास कोणत्याही पदापेक्षा मोठे आहे. त्यामुळे पद मिळाले म्हणून लोकांपासून दूर जाणे किंवा सत्तेच्या बळावर वागणे योग्य नाही.

राजकीय विरोधकांवर निशाणा साधताना त्यांनी सूचक शब्दांत टोला लगावला. गेल्या सहा महिन्यांत आम्ही आमची ताकद दाखवून दिली आहे. त्यामुळे आता जास्त बोलण्याची गरज नाही. मेंदूचा डॉक्टर काही काळ बाहेर राहिल्यामुळे काही मनोरुग्ण बाहेर पडायला लागले आहेत. आता डॉक्टर परत येणार असून सर्वांवर उपचार करणार आहे, असे सांगत त्यांनी उपस्थितांमध्ये एकच हशा पिकवला.

समाजकारण, विकास आणि जनतेच्या प्रश्नांबाबत आपण पूर्वीप्रमाणेच सक्रिय राहणार असल्याचे सांगताना त्यांनी कार्यकर्त्यांनाही जनतेशी सातत्याने संपर्क ठेवण्याचे आवाहन केले. लोकांच्या प्रश्नांसाठी संघर्ष करण्याची आणि विकासाच्या कामांसाठी पाठपुरावा करण्याची परंपरा कायम ठेवणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अहिल्यानगर जिल्ह्यातील आगामी सहकारी, स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर डॉ. सुजय विखे पाटील यांच्या या परखड आणि आक्रमक वक्तव्याची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाली आहे. पदापेक्षा लोकांचा विश्वास मोठा असून जनतेच्या हिताच्या प्रश्नांवर कायम ठाम भूमिका घेत राहू, असा निर्धारही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

## खुनाचा प्रयत्न व मोक्का गुन्ह्यातील सराईत आरोपी सचिन काते शेवगाव पोलिसांच्या जाळ्यात

**शेवगाव । वीरभूमी–**

खुनाचा प्रयत्न, मारहाण तसेच महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मोक्का) दाखल गुन्ह्यातील सराईत आरोपी सचिन साहेबराव काते (रा. सामनगाव, ता. शेवगाव) यास शेवगाव पोलिसांनी आखेगाव रोड परिसरातून सापळा रचून अटक केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ७ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री शहरातील रेसिडेन्शिअल हायस्कूलसमोर झालेल्या वादातून चाकू हल्ल्यात एकाचा मृत्यू झाला होता. या प्रकरणात सचिन काते व त्याच्या साथीदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर सचिन काते हा फरार झाला होता. त्याच्याविरोधात यापूर्वीही गंभीर स्वरूपाचे अनेक गुन्हे दाखल असल्याने पोलिसांनी त्याच्या शोधासाठी स्वतंत्र पथके तयार केली होती. मात्र, त्याचा ठावठिकाणा लागत नव्हता.

तेव्हापासून शेवगाव पोलिस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी आरोपीच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवून होते. दरम्यान, आरोपी आखेगाव रोड परिसरात येणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिस पथकाने सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले. त्यास शेवगाव पोलिस ठाण्यात आणून संबंधित गुन्ह्यात अटक करण्यात आली.



सराईत गुन्हेगार सचिन काते यास ताब्यात घेतल्यानंतर शेवगावचे पोलिस निरीक्षक मोहन बोरसे व पोलिस कर्मचारी.
(छाया : अमोल कराळे)

आरोपी सचिन काते याच्याविरोधात शेवगाव पोलिस ठाण्यात विविध गंभीर कलमान्वये गुन्हे दाखल असून त्याच्यावर मोक्का कायद्यानुसारही कारवाई करण्यात आली आहे. संघटित गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलिसांनी ही कारवाई केली.

ही कारवाई पोलिस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अतिरिक्त पोलिस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलिस अधिकारी नीरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक मोहन बोरसे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

या कारवाईत पोलिस उपनिरीक्षक, अंमलदार व पथकातील कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक बाजीराव सानप करीत आहेत.

## गौरी शुगर अँड डिस्टिलरीज प्रा. लि., हिरडगावचे मिल रोलर पूजन उत्साहात

**श्रीगोंदा । वीरभूमी–**

गौरी शुगर अँड डिस्टिलरीज प्रायव्हेट लिमिटेड, हिरडगाव (युनिट क्रमांक ०४) येथे गळीत हंगाम २०२६-२७ च्या पूर्वतयारीचा महत्त्वपूर्ण टप्पा असलेल्या मिल रोलर पूजन समारंभाचे आयोजन गुरुवार दि. १८ जून २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले.

ओंकार शुगर ग्रुपचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा समारंभ पार पडला. यावेळी ओंकार शुगर ग्रुपचे संचालक ओमराजे बाबुराव बोत्रे पाटील यांच्या शुभहस्ते विधिवत पूजा करून गळीत हंगाम २०२६-२७ च्या कामांना प्रारंभ करण्यात आला.



यावेळी उपस्थितांना संबोधित करताना ओमराजे बाबुराव बोत्रे पाटील यांनी सांगितले की, शेतकरी, कामगार आणि उद्योग यांच्यातील समन्वयाच्या बळावर ओंकार शुगर ग्रुपने अल्पावधीतच साखर उद्योगात वेगळी ओळख निर्माण केली आहे. आधुनिक तंत्रज्ञान, कार्यक्षम व्यवस्थापन आणि शेतकरी हिताला प्राधान्य देत आगामी गळीत हंगाम अधिक यशस्वी करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. गळीत हंगाम २०२६-२७ च्या पूर्वतयारीचा आढावा घेत कारखान्यातील यांत्रिक दुरुस्ती, देखभाल व आवश्यक कामे प्रगतीपथावर असल्याची माहिती दिली. आगामी हंगामात अधिक क्षमतेने व कार्यक्षमतेने ऊस गाळप करण्यासाठी कारखाना सज्ज राहील असे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी कारखान्याचे जनरल मॅनेजर रोहिदास यादव, सर्व खातेप्रमुख, विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी तसेच ऊस उत्पादक शेतकरी व तोडणी वाहतूक ठेकेदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी नवीन गळीत हंगाम यशस्वी होण्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

## संभाजी ब्रिगेडच्या 'आली मरीआई' आंदोलनाने दिंडी निधी घोटाळा आणि बी-१ निविदा प्रकरण गाजले

**श्रीगोंदा । वीरभूमी–**

जनतेच्या हक्काच्या पैशावर डल्ला मारणाऱ्या भ्रष्ट प्रवृत्तींच्या विरोधात संभाजी ब्रिगेडने शुक्रवारी जिल्हा परिषद अहिल्यानगर येथे पारंपरिक 'आली मरीआई' आंदोलन करत प्रशासनाला धारेवर धरले. जून २०२५ मध्ये पायी दिंडी वारीसाठी वितरित करण्यात आलेल्या निधीतील कथित आर्थिक घोटाळा तसेच जिल्हा परिषद अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या बी-१ निविदा प्रक्रियेतील संभाव्य गैरव्यवहारांच्या निषेधार्थ हे आंदोलन करण्यात आले.

संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे यांच्या नेतृत्वाखाली पोतराज, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जिल्हा परिषद कार्यालयापासून मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनापर्यंत जोरदार मोर्चा काढला. वाद्यांचा गजर, पोतराजांचा पारंपरिक सहभाग आणि जय जिजाऊ, जय शिवराय, भ्रष्टाचार मुर्दाबाद, घोटाळेबाजांना शिक्षा झालीच पाहिजे अशा घोषणांनी संपूर्ण जिल्हा परिषद परिसर दणाणून गेला.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे श्रीगोंदा तालुकाध्यक्ष शामभाऊ जरे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. भंडारे यांच्यासमोर संघटनेच्या मागण्या ठामपणे मांडल्या. दिंडी निधीच्या नावाखाली जनतेच्या पैशाची झालेली कथित उधळपट्टी, निविदा प्रक्रियेतील संशयास्पद बाबी आणि प्रशासनाच्या निष्क्रिय भूमिकेवर त्यांनी कठोर शब्दांत टीका केली. जनतेच्या पैशावर डल्ला मारणाऱ्या दोषींना तात्काळ निलंबित करून फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

आंदोलनाची वाढती तीव्रता लक्षात घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. भंडारे यांनी तातडीने शिष्टमंडळाला चर्चेसाठी बोलावले. सुमारे तासभर चाललेल्या चर्चेनंतर प्रशासनाने दिंडी निधी प्रकरणाच्या चौकशीसाठी उच्चस्तरीय चौकशी समिती नियुक्त करण्यात आल्याचे जाहीर केले. चौकशीत दोषी आढळणाऱ्या कोणत्याही अधिकारी, कर्मचारी अथवा संबंधित व्यक्तीची गय केली जाणार नसून कठोर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले.

तसेच बी-१ निविदा प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येईल आणि कोणताही गैरप्रकार अथवा आर्थिक घोटाळा झाल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधित निविदा प्रक्रिया रद्द करण्यात येईल, असेही प्रशासनाने लेखी स्वरूपात नमूद केले.



मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून लेखी आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले. मात्र, दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी झाली नाही, दोषींवर कारवाई झाली नाही किंवा चौकशी दडपण्याचा प्रयत्न झाला तर संभाजी ब्रिगेड यापेक्षाही अधिक तीव्र जनआंदोलन उभारेल, असा इशारा जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे यांनी दिला.

या आंदोलनात जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे, शेतकरी आघाडी जिल्हाध्यक्ष दिलीप वाळुंज, जिल्हा उपाध्यक्ष सुदाम कोरडे, श्रीगोंदा तालुकाध्यक्ष शामभाऊ जरे, पारनेर तालुकाध्यक्ष सचिन काकडे, नगर तालुकाध्यक्ष महेश दानवे, शेतकरी आघाडी तालुकाध्यक्ष उत्तम घोगरे, अल्पसंख्याक आघाडी तालुकाध्यक्ष सद्दाम शेख, अक्षय दहातोंडे, दिलीप लबडे, पांडुरंग खोरे, बापू जगताप, रवींद्र महांडुळे, संदीप मांडोळे, प्रदीप दरेकर, संतोष आरडे तसेच भीमराज कोकाटे, संदीप मांढरे, शशिकांत पवार, अविनाश मेढे, संतोष कोकाटे यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# रोजगार व असंघटित क्षेत्राच्या सर्वेक्षणाला प्रारंभ; अचूक माहितीमुळे धोरणात्मक नियोजनाला चालना

### जिल्हाधिकारी कार्यालयात डॉ. प्रदीप पठारे यांच्या हस्ते शुभारंभ । नागरिकांना सहकार्याचे आवाहन

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

राज्यातील रोजगार, बेरोजगारी तसेच असंघटित क्षेत्रातील उद्योग-व्यवसायांबाबत अचूक माहिती संकलित करण्यासाठी केंद्र शासनाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'नियतकालिक कामगार शक्ती सर्वेक्षण' आणि 'असंघटित क्षेत्र उपक्रमांचे वार्षिक सर्वेक्षण' या दोन महत्त्वाच्या सर्वेक्षणांचा शुभारंभ सहआयुक्त, नगर पालिका प्रशासन डॉ. प्रदीप पठारे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आला.

यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी तथा उपआयुक्त, सांख्यिकी कार्यालयाचे दीपक दातीर, सांख्यिकी सहाय्यक रवि केशव निकाळजे तसेच अन्वेषक प्रशांत आसने, रामचंद्र कदम आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. प्रदीप पठारे म्हणाले की, रोजगार व असंघटित क्षेत्राबाबतची अचूक माहिती उपलब्ध झाल्यास शासनाला विविध योजनांचे नियोजन अधिक प्रभावीपणे करता येते. बेरोजगारी, स्वयंरोजगार, उद्योगांची स्थिती तसेच नागरिकांच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी हे सर्वेक्षण अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयामार्फत देशभर हे सर्वेक्षण राबविण्यात येत असून, त्याद्वारे रोजगार आणि असंघटित क्षेत्राचा सखोल अभ्यास होऊन शासनाला धोरणात्मक निर्णय घेण्यास मदत होणार आहे. या सर्वेक्षणामध्ये नागरिकांची आर्थिक स्थिती, रोजगाराचे स्वरूप, उद्योग-व्यवसाय, वेतन, कामगारांची संख्या तसेच स्थानिक पातळीवरील रोजगाराच्या संधींबाबत माहिती संकलित करण्यात येणार आहे.

नियतकालिक कामगार शक्ती सर्वेक्षण आणि असंघटित क्षेत्र उपक्रमांच्या वार्षिक सर्वेक्षणातून असंघटित क्षेत्रातील उद्योगांची सद्यस्थिती, महिलांचा रोजगारातील सहभाग, स्वयंरोजगार तसेच व्यवसाय क्षेत्रातील बदल यांचाही अभ्यास करण्यात येणार आहे. या सर्वेक्षणांतून प्राप्त होणारी माहिती शासनाला रोजगारनिर्मिती, कौशल्य विकास, उद्योजकता प्रोत्साहन आणि विविध कल्याणकारी योजनांचे नियोजन अधिक परिणामकारकपणे करण्यासाठी उपयुक्त ठरणार असल्याचे डॉ. पठारे यांनी सांगितले.

या सर्वेक्षणासाठी नियुक्त अधिकाऱ्यांनी नागरिकांशी समन्वय साधून अचूक माहिती संकलित करावी तसेच नागरिकांनीही योग्य माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.



वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# वारकऱ्यांच्या सुरक्षितता, सुविधांना प्राधान्य देऊन समन्वयाने नियोजन करा

## पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील । जिल्हाधिकारी कार्यालयात आषाढी वारीच्या नियोजनासंदर्भात आढावा बैठकीचे आयोजन

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

आषाढी वारी ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि सामाजिक परंपरेचे प्रतीक असून लाखो वारकरी या सोहळ्यात सहभागी होत असतात. वारकऱ्यांच्या सुरक्षिततेला व सुविधांना सर्वोच्च प्राधान्य देऊन सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने नियोजन करावे. वारी मार्गावरील सर्व सुविधा वेळेत उपलब्ध करून सुरक्षित, स्वच्छ व सुरळीत वारीसाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आषाढी वारीच्या नियोजनासंदर्भात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जिल्हा पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, उपवनसंरक्षक धर्मवीर साळविठ्ठल, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ, मानाच्या पालख्यांचे प्रमुख, विविध दिंडी प्रमुख तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले की, जिल्ह्यातून आणि इतर ठिकाणांहून अनेक दिंड्या आपल्या जिल्ह्यामार्गे पंढरपूरकडे जातात. श्रीक्षेत्र पंढरपूरकडे जाणाऱ्या दिंड्या आणि पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांना कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही, यासाठी सर्व विभागांनी नियोजनबद्ध पद्धतीने काम करावे. वारी मार्गावरील सर्व रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करून ते खड्डेमुक्त करावेत. दिंडी मार्गावर पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवून वाहतूक व्यवस्थापन चोखपणे करण्यात यावे. मुक्कामस्थळी चोरी, गैरप्रकार अथवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू नये, यासाठी विशेष दक्षता घ्यावी. पोलिसांची गस्त वाढविण्यात यावी. वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी सर्वसमावेशक उपाययोजना करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

दिंडी मार्गावरील सार्वजनिक स्वच्छतागृहे, स्नानगृहे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, कचरा व्यवस्थापन आणि स्वच्छता यावर विशेष भर द्यावा. मुक्कामाच्या ठिकाणी वारकऱ्यांना स्वच्छ व आरोग्यदायी वातावरण तसेच अखंडित वीजपुरवठा उपलब्ध राहील, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात. सोलापूर जिल्ह्यांतही वारकऱ्यांना सर्व सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी संबंधित जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांशी व प्रशासनाशी समन्वय साधण्यात येईल, असेही ते म्हणाले.

दिंडी मार्गावर आवश्यक वैद्यकीय पथके, रुग्णवाहिका, औषधसाठा आणि आपत्कालीन उपचार सुविधा उपलब्ध ठेवाव्यात. महात्मा फुले जनआरोग्य योजनेशी संलग्न रुग्णालयांमध्ये वारकऱ्यांच्या मोफत उपचाराची सोय करावी. वारकऱ्यांच्या आरोग्यविषयक समस्यांवर बारकाईने लक्ष ठेवून आवश्यक उपचार तत्काळ उपलब्ध करून द्यावेत. प्रत्येक दिंडीसाठी संपर्क अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याबरोबरच दिंड्यांच्या मुक्कामाचे नियोजन व संबंधित अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक असलेली संपर्कसूची तयार करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.



वारकऱ्यांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देतानाच एल-निनोच्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता लक्षात घेता पाण्याचा काटकसरीने व जबाबदारीने वापर करण्याचे आवाहनही पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी केले.

बैठकीत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्यासह विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी आपल्या तयारीचा सविस्तर आढावा सादर केला.

बैठकीस सर्व संबंधित विभागांचे अधिकारी, पालखी प्रमुख आणि दिंडी प्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोपरगाव शहर राष्ट्रवादीची कोअर कमिटी जाहीर

**● कोपरगाव । वीरभूमी–**

कोपरगाव शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बांधणीला अधिक बळकटी देण्यासाठी आमदार आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली कोपरगाव शहर राष्ट्रवादी काँग्रेसची कोअर कमिटी जाहीर करण्यात आली आहे. पक्षाची संघटना अधिक सक्षम करून सामाजिक उपक्रम प्रभावीपणे राबविणे तसेच सर्वसामान्य नागरीकांच्या अडीअडचणी तातडीने सुटाव्यात या उद्देशाने या कोअर कमिटीची स्थापना करण्यात आली आहे.



कोअर कमिटीमध्ये शहरातील अनुभवी पदाधिकारी, ज्येष्ठ कार्यकर्ते तसेच युवा नेतृत्वाला संधी देण्यात आली आहे. या माध्यमातून पक्षाचे संघटन अधिक मजबूत होण्यास मदत होणार आहे. कोपरगाव शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या या नव्या कोअर कमिटीमुळे पक्षाची संघटनात्मक ताकद अधिक वाढणार असून शहरातील विविध प्रश्न सोडविण्यासाठी अधिक प्रभावीपणे काम करता येणार आहे.

या कोअर कमिटीमध्ये सुनील गंगुले, दिनार कुदळे, हाजीमेहमूद सय्यद, मंदार पहाडे, कृष्णा आढाव, विरेन बोरावके, बाळासाहेब रुईकर, रमेश गवळी, इम्तियाज अत्तार, शैलेश साबळे, विजय त्रिभुवन, सचिन गवारे, राजेंद्र वाकचौरे, फकीरमामू कुरेशी या अनुभवी कार्यकर्त्यांचा समावेश करण्यात आला आहे.

माजी आमदार अशोकराव काळे व आमदार आशुतोष काळे यांनी सर्व कोअर कमिटीच्या सदस्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहे. आपल्यावर दिलेल्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडून पक्ष बळकटीसाठी प्रयत्न करून नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी सर्वांनी तळागाळातील कार्यकर्त्यांना सोबत घेवून समन्वयाने काम करावे असे आवाहन केले.

कोअर कमिटीच्या निवडी नंतर कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले असून पक्षाच्या आगामी कार्यक्रमांमध्ये अधिक जोमाने सहभाग घेण्याचा निर्धार सर्व पदाधिकाऱ्यांनी व्यक्त करून आमदार आशुतोष काळे यांच्या पाठीशी शहरातील अधिकचे पाठबळ उभे करण्याचा सर्व पदाधिकाऱ्यांनी यावेळी निश्चय केला.

# 'सरसकट कर्जमाफी द्या, अन्यथा संघर्ष पेटेल' : कोळगाव फाट्यावरील रास्ता रोको आंदोलनातून सरकारला थेट इशारा

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

श्रीगोंदा तालुक्यातील कोळगाव फाटा येथे नगर-दौंड महामार्गावर शेतकरी, सर्वपक्षीय नेते आणि विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत भव्य रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. राज्य शासनाने जाहीर केलेल्या कर्जमाफीतील अटी-शर्ती रद्द करून सरसकट कर्जमाफी जाहीर करावी, शेतीमालाला हमीभाव द्यावा आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तातडीने निर्णय घ्यावा, या प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले. आंदोलनानंतर नायब तहसीलदार मिलिंद जाधव यांना निवेदन देण्यात आले.



यावेळी शेतकरी नेते राजेंद्र म्हस्के यांनी शासनाच्या कर्जमाफी धोरणावर जोरदार टीका केली. शेतकऱ्यांना लाभापासून वंचित ठेवण्यासाठी सरकारने कर्जमाफीवर अटींची मोठी गाळण लावली आहे. शेतकरी खऱ्या अर्थाने कर्जमुक्त करायचा असेल तर सातबारा कोरा करा आणि उत्पादन खर्चाच्या दुप्पट हमीभाव द्या, अशी मागणी त्यांनी केली. सरकारने शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्यास गावागावांत आंदोलनाची ठिणगी पेटेल, असा इशाराही त्यांनी दिला.

हेमंत नलगे यांनी शासनाची कर्जमाफी योजना फसवी असल्याचा आरोप करत, वाढते उत्पादन खर्च आणि घटते बाजारभाव यामुळे शेतकरी अधिक कर्जबाजारी होत असल्याचे सांगितले. सर्व पिकांना हमीभाव आणि सरसकट कर्जमाफीची मागणी त्यांनी यावेळी केली.

श्री. झेंडे महाराज यांनी सरकारने दिलेला शब्द पाळून तातडीने संपूर्ण कर्जमाफी जाहीर करावी, अशी मागणी केली. रास्ता रोको आंदोलनानंतरही मागण्या मान्य न झाल्यास रेल रोकोसारखी तीव्र आंदोलने उभारली जातील, असा इशारा त्यांनी दिला.

हरिदास शिर्के यांनी शेतकऱ्यांची मोठी फसवणूक झाल्याचा आरोप करत, २२ जून रोजी तहसील कार्यालयासमोर होणाऱ्या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले. शेतकऱ्यांचा लढा शेतकऱ्यांनाच लढावा लागणार असून सर्वपक्षीय एकजूट कायम ठेवण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

या आंदोलनात राजेंद्र म्हस्के, अनिल घनवट, हेमंत नलगे, बाळासाहेब नाहाटा, झेंडे महाराज, हरिदास शिर्के, बाळासाहेब नलगे, पुरुषोत्तम लगड, मारुती भापकर, राजेंद्र नागवडे, भाऊसाहेब नेटके, स्मितल वाबळे यांच्यासह तालुक्यातील विविध संघटनांचे पदाधिकारी आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वसुंधरा अकॅडेमीत विद्यार्थी परिषदेचा शपथविधी उत्साहात

## विद्यार्थ्यांनी घेतली नेतृत्व, शिस्त आणि समर्पणाची शपथ । नव्या जबाबदाऱ्यांचे उत्साहात स्वागत

**● अकोले । वीरभूमी–**

अभिनव शिक्षण संस्था संचलित वसुंधरा अकॅडेमीमध्ये विद्यार्थी परिषदेच्या निवडणुका नुकत्याच संपन्न झाल्या. त्यानिमित्त आयोजित करण्यात आलेला विद्यार्थी परिषद पदग्रहण व शपथविधी समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. कॉलेज ऑफ सायन्सच्या प्राचार्या सौ. कुसुम वाकचौरे, एमबीए विभागाचे विभागप्रमुख शोएब शेख तसेच वसुंधरा अकॅडेमीच्या प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख आणि उपप्राचार्या राधिका नवले यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.



विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुणांचा विकास व्हावा या उद्देशाने शालेय विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकीचे शिस्तबद्ध आयोजन करण्यात आले होते. स्कूल कॅप्टन, व्हाईस कॅप्टन, हाऊस कॅप्टन आणि प्रीफेक्ट्स या विविध पदांसाठी नियोजनबद्ध पद्धतीने निवडणुका घेण्यात आल्या. सर्व विद्यार्थ्यांनी उत्साहाने मतदानाचा हक्क बजावत निवडणूक प्रक्रिया यशस्वी केली. निवडणूक, मुलाखत आणि ग्राउंड परफॉर्मन्स या प्रक्रियेद्वारे विद्यार्थी परिषदेतील सदस्यांची निवड करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपप्राचार्या सौ. राधिका नवले यांनी प्रास्ताविक करून मान्यवरांचे स्वागत केले. हाऊस ध्वजांची देवाणघेवाण करून विद्यार्थ्यांना बॅज प्रदान करण्यात आले आणि त्यानंतर विद्यार्थी परिषदेचा शपथविधी पार पडला.

यावेळी नव्याने निवड झालेले स्कूल कॅप्टन कु. दिग्विजय विक्रम नवले, स्कूल उपकॅप्टन कु. कस्तुरी दीपक राऊत, सफायर (ब्ल्यू हाऊस) कॅप्टन प्रीतल चासकर व प्रीफेक्ट्स स्वरा सातपुते, निधी आवारी, मृण्मयी नाईकवाडी, तन्वी काकड, एमराल्ड (ग्रीन हाऊस) कॅप्टन सार्थक पेंडभाजे व प्रीफेक्ट्स स्वराली राऊत, इशिका देशमुख, समर्थ कोल्हाळ, निषाद साबळे, रुबी (रेड हाऊस) कॅप्टन विनीत चव्हाण व प्रीफेक्ट्स लावण्या लोहोटे, प्रणव दातखिळे, यज्ञेशा चौधरी, आराध्या चौधरी तसेच डायमंड (यलो हाऊस) कॅप्टन अनन्या चौधरी व प्रीफेक्ट्स ओम तळोले, अदिती दिंदळे, आराध्या गोडसे आणि सर्वेश कातोरे यांनी आपल्या पदाची शपथ घेतली. सर्व विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि समर्पण भावनेने कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला.

विद्यार्थ्यांनी सुमधुर स्वागतगीत आणि आकर्षक नृत्य सादर करून कार्यक्रमाची रंगत वाढवली. नेतृत्व, शिस्त, जबाबदारी आणि संघभावना यांचा संदेश विद्यार्थ्यांनी आपल्या सादरीकरणातून दिला.

कार्यक्रमप्रसंगी प्रमुख अतिथींनी विद्यार्थी परिषदेत निवडून आलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना नव्या जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडण्याची प्रेरणा मिळाली.

यावेळी प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख यांनी शुभेच्छापर भाषणात सांगितले की, नेतृत्व ही केवळ एक पदवी किंवा अधिकार नसून ती एक मोठी जबाबदारी आहे. शाळेची शिस्त, एकता आणि प्रतिष्ठा राखण्यात तुमची भूमिका महत्त्वाची ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. सान्वी झोळेकर आणि कु. अनन्या वनवे यांनी केले. सोनिया कोल्हे, दर्शना शेटे आणि पंकज धुमाळ यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले, तर दिव्या खताळ यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# भिशी व आर्थिक व्यवहाराच्या विवंचणेतून तरुणाची आत्महत्या

**● पाथर्डी । वीरभूमी –**



तालुक्यातील निवडुंगे येथील बाळासाहेब कुंडलिक ढवळे (वय ३५) यांनी काल भिशी व इतर आर्थिक व्यवहारात अडचण निर्माण झाल्याने आर्थिक विवंचनेतुन टोकाचे पाऊल उचलत विष प्राशन करून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. आत्महत्येपूर्वी तयार केलेल्या व्हिडिओत त्यांनी तीन व्यक्तींची नावे घेत गंभीर आरोप केले असून, भिशीचे लाखो रुपये थकल्याने आर्थिक संकटात सापडून आत्महत्या करण्याची वेळ आल्याचा दावा केला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी मृताचे नातेवाईक व हिंदुत्ववादी संघटनांनी केली आहे. याबाबत पाथर्डी पोलिसात संबंधिताविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, बाळासाहेब ढवळे यांनी मंगळवारी सायंकाळी विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. त्यानंतर त्यांना उपचारासाठी शेवगाव येथे दाखल करण्यात आले होते. प्रकृती गंभीर झाल्याने बुधवारी पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथे हलविण्यात येत असताना वाटेतच त्यांचा मृत्यू झाला.

आत्महत्येपूर्वी ढवळे यांनी एक व्हिडिओ रेकॉर्ड करून सोशल मीडियावर प्रसारित केला. या व्हिडिओमध्ये तीन व्यक्तींची नावे घेतली आहेत. संबंधितांनी मला जाणूनबुजून आर्थिक गोत्यात आणले. भिशीचे लाखो रुपये भरले नाहीत, त्यामुळे मी मोठ्या आर्थिक अडचणीत सापडल्यामुळे आत्महत्या करण्याची वेळ आली आहे, असा दावा त्यांनी व्हिडिओत केला आहे.

संबंधितांकडून सातत्याने छळ करण्यात येत होता. भिशीच्या पैशांच्या व्यवहारामुळे निर्माण झालेल्या आर्थिक संकटातून आपण हे टोकाचे पाऊल उचलत असल्याचेही त्यांनी व्हिडिओत स्पष्ट केले आहे. दरम्यान, हा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला असून, मृत्युपूर्वी केलेल्या आरोपांमुळे प्रकरणाला गंभीर वळण मिळाले आहे. पोलिसांकडून घटनेची चौकशी सुरू असून, व्हिडिओतील आरोपांच्या अनुषंगाने तपासाची दिशा निश्चित केली जाणार आहे. पाथर्डी पोलिसांचे पथक संबंधितांचा शोध घेत असल्याची माहिती मिळाली आहे. या घटनेनंतर हिंदुत्ववादी संघटनेचे नेते तथा मढीचे सरपंच संजय मरकड, किरण अकोलकर आणि बाळासाहेब गीते यांनी या प्रकरणी दोषींवर तत्काळ गुन्हे दाखल करून आरोपींना अटक करावी, अशी मागणी केली आहे. काल रात्री पाथर्डी पोलीस ठाण्यात मयत बाळासाहेब ढवळे यांचे भाऊ महेश ढवळे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गळीतास आलेल्या उसाला चांगला भाव व वेळेत पेमेंट देणार

## माजी आ. नरेंद्र घुले पाटील । 'ज्ञानेश्वर'च्या संचालक मंडळाच्या बिनविरोध निवडीनंतर सत्कार समारंभ

**● नेवासा । वीरभूमी–**

गळीतास आलेल्या उसाला चांगला भाव आणि वेळेत पेमेंट देण्यासाठी योग्य नियोजन करण्यात येईल, अशी ग्वाही लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष तथा माजी आमदार नरेंद्र घुले पाटील यांनी दिली.

नेवासा तालुक्यातील भेंडा येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र घुले पाटील यांचे अभिष्टचिंतन तसेच कारखाना संचालक मंडळाच्या बिनविरोध निवडीचे शिल्पकार माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील यांचा ज्ञानेश्वर उद्योग समूह, कामगार संघटना व विविध संस्थांच्या वतीने आयोजित सत्कार समारंभात ते बोलत होते.



यावेळी कारखान्याचे उपाध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग, तज्ज्ञ संचालक डॉ. क्षितिज घुले पाटील, संचालक काकासाहेब नरवडे, बबनराव भुसारी, अशोकराव मिसाळ, पंडितराव भोसले, डॉ. नारायण म्हस्के, जनार्दन शेळके, दादासाहेब कोकणे, जनार्दन कदम, प्रसाद पटारे, मच्छिंद्र म्हस्के, रामनाथ राजपुरे, गोरक्षनाथ भेंडेकर, दत्तात्रय काळे, बाळासाहेब खरड, संतोष पावसे, विकास नन्नवरे, अमोल अभंग, ॲड. हिम्मतसिंह देशमुख, रविंद्र नवले, कार्यकारी संचालक अनिल शेवाळे आणि जनरल मॅनेजर रवींद्र मोटे व्यासपीठावर उपस्थित होते.

नरेंद्र घुले पाटील पुढे म्हणाले की, संघटनेवर विश्वास ठेवून अर्ज मागे घेतलेल्या सहकाऱ्यांमुळे ही निवडणूक बिनविरोध झाली. सर्वांना बरोबर घेऊन त्यांच्या सूचना व कल्पना विचारात घेत पुढील वाटचाल केली जाईल. संपूर्ण आशिया खंडात 'एल नीनो'चे संकट असून, या नैसर्गिक अडचणींवर मात करत ऊस उत्पादन वाढीसाठी अधिक प्रयत्न करण्याची गरज आहे.

यावेळी पांडुरंग अभंग, काकासाहेब नरवडे आणि अनिल शेवाळे यांनी मनोगत व्यक्त करून नरेंद्र घुले पाटील यांना शुभेच्छा दिल्या.

समारंभास माजी संचालक जनार्दन पटारे, बाळासाहेब नवले, विष्णूपंत जगदाळे, अजित मुरकुटे, डॉ. शिवाजी शिंदे, अशोक वायकर, नामदेव निकम, बबनराव धस, तांत्रिक सल्लागार एम. एस. मुरकुटे, एस. डी. चौधरी, महेंद्र पवार, मुख्य अभियंता राहुल पाटील, मुख्य शेतकी अधिकारी सुरेश आहेर, नंदकिशोर पाटील, प्रशासकीय अधिकारी कल्याण म्हस्के, कामगार अधिकारी बाळासाहेब डोहाळे, लीगल ऑफिसर सुनील शिंदे, कामगार संघटनेचे सचिव संभाजी माळवदे, अण्णासाहेब गर्जे, संजय राऊत, अंकुश दाभाडे, अरविंद ठाणगे, संदीप फुलारी, किसन यादव, कुमार नवले, सोपान महापुर, हरीभाऊ नवले, प्राचार्य डॉ. शिरीष लांडगे, उपप्राचार्य भारत वाबळे आदी उपस्थित होते. कामगार संचालक सुखदेव फुलारी यांनी सूत्रसंचालन केले, तर जनरल मॅनेजर रवींद्र मोटे यांनी आभार मानले.

# धामणगाव येथील शेतकऱ्याचा मारहाणीत मृत्यू; चार संशयित पोलिसांच्या ताब्यात

**● पाथर्डी । वीरभूमी –**

पाथर्डी शहराजवळील देवीचे धामणगाव येथील किरण अप्पासाहेब काकडे (वय ४५) यांचा अज्ञात व्यक्तींनी केलेल्या बेदम मारहाणीत मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी मृताच्या पत्नीने अज्ञात मारेकऱ्यांविरोधात पाथर्डी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, पाथर्डी पोलिस व स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने शहरातील चार संशयितांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. न्यायालयात हजर केले असता त्यांना पोलिस कोठडी सुनावण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, धामणगाव येथील किरण काकडे हे शेती व्यवसाय करीत होते. बुधवारी ते उपचारासाठी पाथर्डी येथील एका खासगी रुग्णालयात आले होते. उपचारानंतर रात्री ते पाथर्डी शहरातील शेवगाव रस्त्यावरील परिसरात आले असता काही अज्ञात व्यक्तींनी त्यांना अडवून बेदम मारहाण केली. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले.

घटनेनंतर त्यांना तातडीने पाथर्डी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी गुरुवारी अहिल्यानगर येथे हलविण्यात येत असताना वाटेतच त्यांचा मृत्यू झाला.

या घटनेनंतर पाथर्डी पोलिस व एलसीबीच्या पथकाने तपासाची चक्रे वेगाने फिरवत चार संशयितांना चौकशीसाठी ताब्यात घेतले. संशयितांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना पोलिस कोठडी सुनावली. पोलिसांच्या चौकशीतून या हल्ल्यामागील नेमके कारण स्पष्ट होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, या घटनेभोवतीचे गूढ कायम असून, नागरिकांमध्ये विविध चर्चांना उधाण आले आहे.